DAY — **17** SEAT NUMBER | | | | | | |

2025	III	05	1500	**J-413**	(M)

PSYCHOLOGY (48)

Time : 3 Hrs. **(6 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

(३) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पृष्ठावर करावा.

प्र. १. **(अ)** कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा व वाक्य पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) १८७० च्या दशकापर्यंत मानसशास्त्र हे -------- शाखा होते.

(भौतिकशास्त्राची, तत्त्वज्ञानाची, शरीरशास्त्राची)

(२) संवेदनांच्या ---------- तत्त्वानुसार आपण अपूर्ण आकृतीला पूर्ण करून पाहतो.

(समीपता, समानता, समावेशन)

(३) भावनिक भाषिक गैरवर्तनात -------- समावेश होतो.

(नाकारण्याचा, बहिष्कृत करण्याचा, अपमानास्पद बोलण्याचा)

(४) धाप लागणे हे चिंता विकृतीचे ------ लक्षण आहे.

(वर्तनात्मक, मानसिक, शारीरिक)

(५) चांगल्या गोष्टी आपल्या आयुष्यात घडतीलच असा विश्वास म्हणजे ------.

(निराशावाद, लवचिकता, आशावाद)

(ब) खालील 'अ' व 'ब' गटांतील शब्दांच्या योग्य जोड्या लावा : (५)

'अ' गट	'ब' गट
(अ) रसायनशास्त्र	(१) आंतरव्यक्तिक बुद्धिमत्ता
(ब) हॉवर्ड गार्डनर	(२) लढा वा पळा
(क) स्वादुपिंड	(३) विसंगत भावना
(ड) भीती	(४) नैसर्गिक शास्त्र
(इ) छिन्नमनस्कता	(५) मानसिक वय
	(६) अंत:स्रावी ग्रंथी

(क) खालील विधाने 'बरोबर' आहेत की 'चूक' ते लिहा : (५)

(१) कृत्रिम बुद्धिमत्तेला मर्यादा आहेत.

(२) राहूल भावनिकदृष्ट्या उबदार वातावरण असणाऱ्या कुटुंबात वाढत आहे. कुटुंबातील या उबदार वातावरणामुळे तो अधिक सुसमायोजित होईल.

(३) सर्जनशील विचारासाठी पूर्वतयारीची आवश्यकता नसते.

(४) स्वत:ला इजा करण्याची प्रवृत्ती ही त्या व्यक्तीला तज्ज्ञ व्यक्तीच्या मदतीची आवश्यकता दर्शवणारा संकेत होय.

(५) मास्टन यांना सकारात्मक मानसशास्त्राचा जनक म्हणतात.

(ड) खालील प्रश्नांची प्रत्येकी 'एका' वाक्यात उत्तरे लिहा : (५)

(१) अमेरिकन मानसशास्त्राचा जनक कोणाला म्हणतात?

(२) प्रवाही बुद्धिमत्ता आणि स्फटिक बुद्धिमत्ता या बुद्धिमत्तेच्या संकल्पना कोणी मांडल्या?

(३) कथावस्तू आसंवेदन चाचणी कोणी निर्माण केली?

(४) नि:पक्षपातीपणे ऐकणे म्हणजे काय याचा अर्थ लिहा.

(५) दुसऱ्या व्यक्तीच्या भावना स्वत:च्या नजरेतून अनुभवण्याची क्षमता म्हणजे काय?

प्र. २. खालील प्रश्नांची प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा (कोणतीही पाच) : **[१०]**

(१) मानवतावादाच्या उदयाबद्दल थोडक्यात माहिती लिहा.

(२) भावनिक बुद्धिमत्तेचा अर्थ तुमच्या भाषेत स्पष्ट करा.

(३) प्रधान गुणविशेषाचा अर्थ उदाहरणाच्या आधारे लिहा.

(४) भावनिक अनुभव घेताना होणारे शरीरबाह्य बदल लिहा.

(५) द्विध्रुवीय विकृतीची लक्षणे लिहा.

(६) मानसिक आरोग्य प्रथमोपचारात अंधश्रद्धा व्यक्तीला कसा अडथळा ठरते ते स्पष्ट करा.

(७) बेफिकीरपणाचा अर्थ तुमच्या शब्दात लिहा.

प्र. ३. खालील बाबींवर प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत संक्षिप्त टिपा लिहा **[१२]**

(कोणत्याही चार) :

(१) निरीक्षण पद्धत

(२) अवधान विभाजन

(३) भावनिक सुदृढतेचे फायदे

(४) भयगंड

(५) इंटरनेटवरील अति अवलंबन

(६) शून्याच्या वरील जीवन

प्र. ४. खालील उदाहरणांवर आधारित प्रश्नांची केवळ शब्दांत उत्तरे लिहा **[८]**

(कोणतेही चार) :

(१) दिनेशने व्यायामाचे प्रमाण वाढवल्याने त्याच्या शरीरातील मेदाचे प्रमाण कमी झाले. व्यायाम आणि मेदाचे प्रमाण यात कोणत्या प्रकारचा सहसंबंध आहे?

(२) बबन नेहमी इतरांना समजून घेतो आणि इतरांबरोबरही मिळून-मिसळून राहतो. बबनमध्ये बुद्धिमत्तेचा कोणता प्रकार जास्त प्रमाणात आहे?

(३) बक्षिस आणि कौतुकामुळे शैलेश पोहायला शिकला. हे अध्ययनाच्या कोणत्या प्रकाराचे वर्णन आहे?

(४) दु:खात असलेल्या मनिषाला तिच्या मैत्रिणींनी आम्ही तुझ्या दु:खात सहभागी आहोत असे सांगितले व तिला रोज फिरायला जाण्याचा सल्ला दिला. तर मनिषाच्या मैत्रिणीनी अल्गी *(ALGEE)* कृती योजनेतील कोणत्या कृतीचा अवलंब केला?

(५) तीव्र वेदनेमुळे प्रशांतला पायावर शस्त्रक्रिया करावी लागली. या दुखण्यातून तो लवकर बरा झाला व पुन्हा पूर्वीसारखा क्रिकेटच्या संघात खेळू लागला. तर प्रशांतने कोणत्या प्रकारची लवचिकता दर्शविली?

(६) शिक्षकांनी नमुना गटातील विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० संदर्भातील मतांविषयी माहिती गोळा केली. तर शिक्षकांनी माहिती गोळा करण्यासाठी कोणती पद्धत वापरली?

प्र. ५. खालील संकल्पना २५ ते ३० शब्दांत स्पष्ट करा (कोणत्याही पाच) : **[१०]**

(१) वृत्तेतिहास पद्धत

(२) व्यक्तिमत्त्व

(३) संवेदन

(४) रागाची सूचके

(५) सूचना अवस्था

(६) निरोगी झोप- स्व-मदत उपाययोजना

(७) सजगता

प्र. ६. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रत्येकी ८० ते १०० शब्दांत लिहा : **[१०]**

(१) समस्या परिहार प्रक्रियेतील पायऱ्या स्पष्ट करा -

मुद्दे :

(i) समस्या ओळखणे

(ii) पर्यायी उपाय शोधणे

(iii) एखादा पर्याय निवडणे

(iv) पर्यायाची अंमलबजावणी करून पाठपुरावा करणे

(२) राग व्यवस्थापनाचे प्रतिसाद तंत्र स्पष्ट करा -

मुद्दे :

(i) कुटुंबातील व्यक्तींसोबत चर्चा करा

(ii) समोरच्या व्यक्तीसोबत बोला

(iii) सक्रिय श्रवण

(iv) तुमचा राग पिंजऱ्यात बंद करा

(३) मानसिक विकृतीचे निकष स्पष्ट करा –

मुद्दे :

(i) चिकित्सालयीन लक्षणे

(ii) मन:स्ताप व अक्षमता

(iii) कार्यात्मक बिघाड

(iv) तीव्र ताणकांना दिली जाणारी सर्वसामान्य अपेक्षित प्रतिक्रिया मानसिक विकृतीचे लक्षण मानले जात नाही.

प्र. ७. पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १५० ते २०० शब्दांत स्पष्ट करा : [१०]

(१) बुद्धिमापन चाचण्यांचे विविध प्रकार स्पष्ट करा.

(२) व्यक्तिमत्त्व–मापनाच्या विविध पद्धती स्पष्ट करा.

◆◆◆